**पंतप्रधानांची कझाकिस्तान, किर्गिझ प्रजासत्ताक, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान आणि उझबेकिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांसोबत भेट**

06 जून 2025

1. कझाकिस्तान, किर्गिझ, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान आणि उझबेकिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांनी आज पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांची संयुक्तपणे भेट घेतली.

2. नवी दिल्ली येथे आज सकाळी पार पडलेल्या भारत-मध्य आशिया संवादाच्या 4थ्या बैठकीत झालेल्या सकारात्मक आणि फलदायी चर्चेची माहिती मंत्र्यांनी पंतप्रधानांना दिली.

3. मध्य आशियाई देशांबरोबरचे संबंध हे भारतासाठी नेहमीच अग्रक्रमाचे राहिले असल्याची बाब यावेळी पंतप्रधानांनी अधोरेखित केली. परस्परांच्या नागरिकांमधील ऐतिहासिक संबंधांवर भर देत, त्यांनी वर्धित आर्थिक अंतर्गत संबंध, विस्तारित कनेक्टिव्हिटी, वर्धित संरक्षण आणि सुरक्षा सहकार्य आणि नवीन आणि उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये व्यापक सहकार्य यावरील आपला दृष्टिकोन मांडला.

4. भारत-मध्य आशिया दरम्यानची मजबूत भागीदारी सामायिक प्रादेशिक आणि जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रबळ शक्ती म्हणून काम करते हे पंतप्रधानांनी अधोरेखित केले.

5. मध्य आशियाई परराष्ट्र मंत्र्यांनी 22 एप्रिल 2025 रोजी पहलगाम  येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला आणि सीमापार दहशतवादाविरोधातील भारताच्या लढ्याला पाठिंबा दर्शविला.

6. पंतप्रधानांनी भारतात होणाऱ्या दुसऱ्या भारत-मध्य आशिया शिखर परिषदेसाठी सर्व मध्य आशियाई देशांच्या नेत्यांना आमंत्रित केले.

**नवी दिल्ली**

**06 जून 2025**